# दूध पिणारा गणपती

21 सप्टेंबर 1995

दुपारी अडीचच्या सुमाराला अ. पां. देशपांडे यांचा फोन आला. "जयंतराव !तुम्ही पूर्वी' उजव्यासोंडेचा गणपती' ही विज्ञानकथा लिहिलीत. आता 'दूध पिणारा गणपती' अशी गोष्ट लिहा"

हे काय गौडबंगाल आहे ?

अ. पां. नी खुलासा केला. सगळीकडे बातमी पसरली आहे की गणपतीच्या मूर्ती दूध पीत आहेत . . . मुंबईत नव्हे तर अख्ख्या भारतात. गणपतीपुढे रांगा लागल्यात. नंतर आढळून आले की ही अतिशयोक्ती नव्हती. बृहद्भारतात *(बृहन्महाराष्ट्र असतो तर बृहदभारत का नसेल)* म्हणजे प्रवासी-निवासी अनिवासी भारतीय असतात तिथे गणपतीच काय पण इतर देवांच्या मूर्त्याही दूध पीत होत्या.

पुराणात गणपतीचा दुधाशी संबंध आल्याचे वाचले नव्हते.

खुद्द दहा दिवस चालणाऱ्य गणेशोत्सवात असंख्य गणपतीच्या मूर्तीपुढे असंख्य 'भक्तां'पैकी कोणी दूध ठेवल्याचे ऐकले नव्हते.

मग 'दूध' हा प्रसाद गणपतीला भरवण्याचे सुचले कोणाला ?

आणि इतक्या दूरवर पसरलेल्या विविध गणपतींना दूध देण्याचे प्रयोग इतक्या झटपट कसे केले गेले ?

शिवाय नेहमी काम आणि कम्प्युटिंगच्या घाईत असलेल्या मुंबईकराला देखील देवळांपुढे रांग लावायला वेळ मिळाला कसा ?

हो आणि मूळ प्रश्न बाजूलाच राहिला. गणपती दूध पितो म्हणजे नेमके काय करतो ?

इथे ह्या शेवटच्या प्रश्नाची चर्चा करीत नाही. वैज्ञानिकांनी खुलासा लगेच केला आणि 'पत्रिकेत' पण तो येणारच . . . म्हणजे इथे अनाकलनीय असे काही नाही. प्रत्यक्ष घरी प्रयोग करून पहावा म्हणजे 'सर्फेस टेंशन' च्या गुणांचा प्रत्यय येईल.

पण बाकीच्या प्रश्नांचे काय ?

ह्या घटनेची सुरुवात कशी झाली हे गूढ सुटले तर बरे होईल. अतिरेकी संघटनांप्रमाणे ह्या घटनेची 'जबाबदारी' कोणी पुढे येऊन *(किंवा निनावी पत्र/ फोन मार्गे)* घेतल्याचे माझ्यातरी ऐकिवात नाही.

आता पसरण्याची बाब ! आपण विज्ञानयुगात वापरतोय याची जाणीव मला त्या दिवशी प्रकर्षाने झाली. आपली संचार साधने आता इतकी सक्षम झाली आहेत की 'माहिती' आसेतु हिमाचल, ब्रह्मपुत्रेपासून सिंधूपर्यंत पसरायला वेळ लागत नाही. गेल्या शतकात हे शक्य झाले नसे. विज्ञान-तंत्रज्ञानानी पुरवलेली साधने किती प्रभावी असू शकतात हे ह्या घटनेने दाखवून दिले.

आणि सामान्य माणसे आणि त्यांची सामान्य नेतेमंडळी हा वरवरचा वैज्ञानिक मुलामा पुसला तर अजून गेल्या शतकातच आहेत हे देखील ह्या घटनेने सिद्ध केले. अजून चमत्काराची कल्पना मानवी मनाला भुरळ घालू शकते. आपल्या पाप-पुण्याचे मोजमाप गणपतीने आपल्या हातून किती दूध घेतले *(वा घेतले नाही)* त्यावरून ठरते का ?

ह्या प्रसंगी अंधश्रद्धांना वैज्ञानिक साधनेत खत-पाणी घालतात असा हा विरोधाभास आहे. चित्त ठिकाणावर ठेवून 'ही अंधश्रद्धा आहे' हे ठामपणे सांगणारे अभिनंदनीय आहेत.

21 सप्टेंबरचा 'चमत्कार' और घटकेचा ठरला ही बाब एक आशेचा किरण दाखवून गेली.

**— डॉ. जयंत नारळीकर**